**स. क्रि. केस नं. १५४/२०१९**

**निशाणी – २२ लगत**

**<u>फिर्यादीचा उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री.एम.एम.शिंदे यांचे मार्फत सुरु</u>**

१२. माझे शिक्षण डिप्लोमा सिव्हील इंजिनिअर झाले आहे. माझ्याकडे बांधकाम कॉट्रॅक्ट घेण्याचा परवाना आहे. त्या परवान्याचा नंबर मला सांगता येणार नाही. हे खरे की, एखाद्या जागेचे बांधकाम करायचे असेल तर त्या बांधकामाचा करार त्या जागेच्या मुळ मालकाशी केला जातो. मी कॉट्रॅक्टचा व्यवसाय सन २०१७ करतो. हे खरे नाही की, बांधकामाचे कॉट्रॅक्ट घेताना मी आर्किटेक्चर डिझाईन स्वतः करत नाही. हे खरे की, बांधकामाचा करार करताना ते बांधकाम कोणत्या स्वरुपाचे असणार आहे याचा करारात उल्लेख असतो. हे खरे की, करारात बांधकामाचा दर्जा व त्याकरीता वापरले जाणारे सामान याचा उल्लेख असतो. हे खरे की, करारात बांधकाम चांगल्याप्रतीचे करायचे असा आम्ही केलेला असतो. हे खरे की, त्या करारात बांधकाम चांगल्या प्रतीचे करायचे अशी हमी आम्ही दिलेली असते.

प्रश्न – बांधकाम निकृष्ठ दर्जाचे झाले तर होणाऱ्या नुकसानाची भरपाई तुम्ही कराल असा करारात उल्लेख असतो ?

उत्तर – या करारात तसा उल्लेख नाही.

१३. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर ते निकृष्ठ दर्जाचे झाले असल्यास त्याची जबाबदारी आमची नसते. हे खरे की, करारपत्रात किती चौरस फुट काम करायचे याचा उल्लेख असतो. हे खरे की, करारपत्रात रकमेच्या हप्तांचा उल्लेख असतो. हे खरे की, ते हप्ते आम्ही ॲडव्हान्स

पासून चालू करतो. हे खरे की, ॲडव्हान्स स्वीकारल्यानंतर पुढील कामाचा जो टप्पा ठरला असेल तो पुर्ण झाल्यानंतर आम्ही पुढील हप्ता घेतो. हे खरे की, दिनांक ०४/०३/२०१८ रोजीचा करार हा आरोपी सोबत केलेला नाही. हे खरे की, या करारात बांधकाम एकत्र कुटूंबाकरीता करत आहोत असा उल्लेख नाही. हे खरे की, या करारात तसा उल्लेख करायला मला काही अडचण नव्हती. हे खरे की, या करारात लिहून घेणार, देणार अगर ओळख व साक्षीदार म्हणून आरोपीची सही घेण्यास काही अडचण नव्हती.

आरोपीतर्फे तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

दि. १६/०३/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.

**स. क्रि. केस नं. १५४/२०१९**

**निशाणी – २२ लगत**

**फिर्यादीचा उर्वरित उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री.एम.एम.शिंदे यांचे मार्फत सुरु**

१४. हे खरे की, आमच्यात झालेला करार हा मी व बाळकृष्ण सुरेश भिंताडे यांच्यात झालेला आहे.

प्रश्न – आरोपी हे बाळकृष्ण सुरेश भिंताडे यांच्या कुटूंबातील असल्याबाबत कागदोपत्री पुरावा तुम्ही घेतलेला नाही ?

उत्तर – विश्वासाचे संबंध असल्यामुळे घेतलेला नाही.

प्रश्न – बाळकृष्ण सुरेश भिंताडे व आरोपी यांच्यातील व्यवहार एकत्रात चालतात असे दाखविणारा पुरावा तुमच्याकडे नाही ?

उत्तर – त्यांनी मला एकत्र कुटूंबात असल्याबाबत पैसे दिले आहेत. काही पैसे रोख स्वरुपात व काही बँकेतून दिले.

आरोपीने मला पैसे दिले असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी कोर्टात दाखल करायला तयार आहे. हे खरे नाही की, आरोपीने मला चेकपुर्वी पैसे दिले नसलेने तसा कागदोपत्री पुरावा मी कोर्टात दाखल केला नाही. तसा पुरावा याकामी दाखल नसून मी दाखल करु शकतो.

१५. हे खरे नाही की, या चेकवरील रकमेव्यतिरीक्त बांधकामाची रक्कम मला पोहोच झाली आहे. हे खरे की, कराराप्रमाणे १६,३०,८००/– इतक्या किमतीस आमचे काम ठरले होते. साक्षीदारास निशाणी ४१/१ वरील कागदपत्र दाखविले. साक्षीदारास ते मान्य असल्याने त्यास निशाणी ४२ देण्यात येते. ते कागदपत्र म्हणजे पत्र असून ते पत्र मी

बँकेला दिले आहे. पत्रात कमल सुरेश भिंताडे यांच्याकडून रक्कम रु.१६,१०,०००/– मला बांधकामाकरीता मिळाले असे नमुद आहे. (साक्षीदार सांगतात मी असे लिहून दिले कारण या पत्रावरुन कर्जाची रक्कम बँकेमार्फत आरोपीला मिळणार होती व ती रक्कम आरोपी मला देणार होता.) हे खरे की, या पत्रातील मजकूर खरा आहे. हे खरे की, करारपत्रात ठरलेल्या रकमा मला बाळकृष्ण सुरेश भिंताडे यांनी वेळोवेळी दिल्या आहेत. साक्षीदार सांगतात केवळ शेवटची रक्कम राहिली आहे.

१६. हे खरे नाही की, आरोपी व माझी पुर्वीपासून ओळख नव्हती. हे खरे नाही की, घराचे बांधकाम ठरल्याप्रमाणे होत नसल्याने बाळकृष्ण भिंताडे व माझ्यात वाद सुरु होता. हे खरे नाही की, त्यावेळी आरोपी आमच्यात मध्यस्ती करत होता. हे खरे नाही की, मी बाळकृष्ण भिंताडे यांचे काम करारपत्राप्रमाणे केले नाही. हे खरे की, बाळकृष्ण सुरेश भिंताडे यांनी माझ्याविरुध्द जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच सातारा येथे तक्रार केली. साक्षीदार सांगतात की, तक्रार खोटी आहे. (साक्षीदारास निशाणी ४१/२ वरील तक्रार दाखवली.) ती तक्रार माझ्याविरुध्द केली आहे. तक्रारीस निशाणी ४३ देण्यात येते. हे खरे नाही की, या तक्रारीची नोटीस मला आली होती. हे खरे की, मी हजर राहून त्याकामी म्हणणे दाखल केले आहे. हे खरे की, ती तक्रार अद्याप न्यायप्रविष्ठ आहे. हे खरे नाही की, तक्रार दाखल करण्यापुर्वी माझ्यात व बाळकृष्ण भिंताडे यांच्यात वाद झाला होता. हे खरे नाही की, तो वाद हा करारपत्राप्रमाणे बांधकाम केले असून बाळकृष्ण भिंताडे यांनी त्यांचे पैसे द्यावेत याबाबतचा होता. हे खरे नाही की, बांधकाम निकृष्ठ दर्जाचे असल्याने बाळकृष्ण भिंताडे पैसे देण्यास तयार नव्हता. हे खरे नाही की, बांधकामाचे पैसे दिल्याशिवाय वाद मिटवायला मी

तयार नव्हतो. हे खरे नाही की, त्यावेळी आरोपीने मध्यस्ती केल्याने मी, बाळकृष्ण भिंताडे व आरोपी यांच्यात ग्राहक मंचात तक्रार करायचे ठरले. हे खरे की, बांधकामाकरीता लागणारे साहित्य मी क्रेडीटवर घेतले होते. हे खरे की, त्या बांधकामाच्या साहित्याचे व मजूरांचे पैसे मी द्यायचे होते. हे खरे नाही की, त्याकरीता मला बाळकृष्ण भिंताडे यांच्याकडून चेक हवा होता. हे खरे नाही की, तो चेक मध्यस्ती म्हणून आरोपीने द्यायचे ठरले. हे खरे नाही की, ग्राहक मंचाच्या निर्णयाप्रमाणे वागून तो चेक आरोपीला परत करायचे असे ठरले. हे खरे नाही की, आरोपीने मध्यस्ती म्हणून मला चेक दिला. हे खरे नाही की, बांधकाम वैयक्तिकरित्या बाळकृष्ण सुरेश भिंताडे यांचे आहे. हे खरे नाही की, आरोपी माझे कायदेशीर देणे लागतो असे दाखविणारा पुरावा माझ्याकडे नाही. हे खरे नाही की, बांधकाम बाळकृष्ण भिंताडे व आरोपी यांच्या एकत्र कुटूंबाचे आहे हे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, आरोपीने बांधकामाच्या रकमेपोटी चेक दिल्याचे खोटे सांगतो. हे खरे की, बाळकृष्ण भिंताडे यांनी ग्राहक न्यायालयात पुरावा दिला आहे. साक्षीदार सांगतात तो खोटा आहे. हे खरे नाही की, ग्राहक न्यायालयात झालेल्या पुराव्यावरुन बांधकाम निकृष्ठ असल्याचे सिध्द झाले आहे. हे खरे नाही की, त्यामुळे ग्राहक न्यायालयाचा निकाल माझ्या विरुध्द जाईल असे माझे मत झाले आहे. हे खरे नाही की, सरतपासात कथन केलेला संपुर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देतो.

उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. ०६/०४/२०२३

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.